उच्च माध्यमिक आश्रमशाळेच्या विज्ञान शाखेत नियुक्त करण्यात आलेल्या उच्च माध्यमिक शिक्षकांना मान्यता प्रदान करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
इमाव,साशैमा,विजाभज व विमाप्र कल्याण विभाग.
शासन निर्णय क्र. उमाशि-२०१९/प्र.क्र. ८६१/विजाभज-२
मंत्रालय, मुंबई-४०००३२,
दिनांक : ०९ सप्टेंबर, २०१९

वाचा :- १.शासन निर्णय, समाज कल्याण व विशेष सहाय्य विभाग क्र.विभशा-२००६/प्र.क्र.५९/विजाभज-२दि. २६/०६/२००८
२. शासन निर्णय, समाज कल्याण व विशेष सहाय्य विभाग क्र.विभशा-२००६/प्र.क्र.५९/मावक-६. दि. ३१/०८/२००९
३. शासन निर्णय, समाज कल्याण व विशेष सहाय्य विभाग क्र.विभशा -२००६/प्र.क्र.४७/विजाभज-२दि. २१/०१/२०१३

प्रस्तावना:-

राज्य शासनाने राज्यातील विजाभज प्रवर्गाच्या मुलासाठी चालविल्या जाणाऱ्या माध्यमिक आश्रमशाळांना जोडून १४८ उच्च माध्यमिक आश्रमशाळांना परवानगी दिली होती. सदरहु शासन निर्णयानुसार उच्च माध्यमिक आश्रमशाळेच्या कला व विज्ञान शाखेत नियुक्त करावयाच्या उच्च माध्यमिक शिक्षकांची शैक्षणिक अर्हता काय असावी हे नमूद करण्यात आलेले आहे. परंतु सदरहु शासन निर्णय उच्च माध्यमिक आश्रमशाळेच्या विज्ञान शाखेत नियुक्त करण्यात येणाऱ्या ०२ उच्च माध्यमिक शिक्षकांच्या शैक्षणिक अर्हतेमध्ये संदिग्धता असल्याने संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयातील ३(अ) व (ब) मधील टिप संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णयानुसार रद्द करण्यात आली आहे. मात्र, सदरहु शासन निर्णयानुसार उच्च माध्यमिक शिक्षकांच्या शैक्षणिक अर्हतेबाबतची संदिग्धता संपुष्टात आलेली नाही. त्यामुळे राज्यातील विजाभज उच्च माध्यमिक आश्रमशाळेच्या विज्ञान शाखेत नियुक्त करण्यात येणाऱ्या शिक्षकांच्या शैक्षणिक अर्हता संदर्भातील संदिग्धता दुर करणे आवश्यक आहे. सदरहु शासन निर्णयातील तरतूदीनुसार विज्ञान शाखेसाठी ०२ शिक्षक नियुक्त केल्यानंतर व सदरहु आश्रमशाळेतील विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या अभ्यास क्रमानूसार निवड केलेल्या विषयांच्या गटाप्रमाणे सदरहु आश्रमशाळेतील विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांना भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र,वनस्पतीशास्त्र किंवा प्राणीशास्त्र हे विषय शिकविण्यासाठी शिक्षक नसल्यामुळे संबंधित आश्रमशाळांना अडचणी येत आहेत. त्यामुळे या विभागाच्या दि.२६/०६/२००८ च्या शासन निर्णयानुसार उच्च माध्यमिक आश्रमशाळेच्या विज्ञान शाखेत ०२ शिक्षक नियुक्त करण्यास मान्यता दिल्यानंतर या उच्च माध्यमिक आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना अन्य विषयांचे अध्यापनासाठी शिक्षक उपलब्ध नसल्याने किंवा शिक्षण विभागाप्रमाणे विशिष्ट अर्हतेचे शिक्षक उपलब्ध करुन देण्यात येत नसल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. तसेच संस्था चालकांचीही अडचण होत आहे.

त्यामुळे सदरहु प्रकरणी वरील सर्व बाबी विचारात घेता या विभागाच्या उच्च माध्यमिक आश्रमशाळेतील विज्ञान शाखेसाठी उच्च माध्यमिक शिक्षकांची शैक्षणिक अर्हता निश्चित करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

सदरहु शासन निर्णयानुसार या विभागातर्फे चालविल्या जाणाऱ्या शासन मान्य अनुदानीत विजाभज उच्च माध्यमिक आश्रमशाळेच्या विज्ञान शाखेत उच्च माध्यमिक शिक्षक या पदावर नियुक्त करण्यासाठी संदर्भ क्र.०१ येथील दि.२६/०६/२००८ च्या शासन निर्णयातील ३ (ब) (ii) मधील तरतूद अधिक्रमित करण्यात येत आहे. त्याऐवजी उच्च माध्यमिक आश्रमशाळेच्या विज्ञान शाखेत नियुक्त करावयाच्या ०२ उच्च माध्यमिक शिक्षकांची शैक्षणिक अर्हता एम.एस.सी. (गणित/ रसायनशास्त्र/ भौतिकशास्त्र/ वनस्पती शास्त्र/ प्राणीशास्त्र) व बी.एड. अशी निश्चित करण्यात येत आहे.

२. शासन निर्णय दि.२६/६/२००८ मध्ये नमूद केल्याप्रमाणे विज्ञान शाखेत नियुक्त करावयाच्या उमेदवाराकडे आवश्यकती शैक्षणिक अर्हता नसतांना सुध्दा संबंधित प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग यांनी यापूर्वी ज्या ज्या उमेदवारांना मान्यता दिली आहे त्या उमेदवारांचे सर्व प्रस्ताव खुलासासह या शासन निर्णयाप्रमाणे फेर मान्यतेसाठी या विभागाचे प्रधान सचिव/सचिव यांच्याकडे पाठविण्यात यावेत. तो पर्यंत त्यांचे वेतन अदा करु नये.

३. याबाबतचे जे प्रस्ताव क्षेत्रिय कार्यालयाकडे प्रलंबित आहेत व या शासन निर्णयानुसार पात्र ठरतात असे प्रस्ताव सुध्दा योग्यत्या शिफारशीसह /आरक्षणाच्या धोरणानुसार बिंदूनामावलीसह प्रधान सचिव यांच्याकडे मान्यतेसाठी पाठवावेत. जेणे करुन त्यावर गुणवत्तेनुसार योग्य तो निर्णय घेण्यात येईल. याबाबतचे प्रस्ताव फक्त ज्या उच्च माध्यमिक आश्रमशाळांना शासनाची रितसर मान्यता देण्यात आलेली आहे त्याच उच्च माध्यमिक आश्रमशाळांतील उमेदवारांचे प्रस्ताव पाठवावेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेला असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २०१९०९१३१७५०४६०५२२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Bhaurao Raghunath Gavit

Digitally signed by Bhaurao Raghunath Gavit
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=VJNT OBCS SBC Welfare Dept., postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=692454783803b1bf08be0ff2505a01eb578c61edfbb827457be5704f5b440067, serialNumber=950bc6a64b0801087d4b403d7351619557bcd3489ca14b4e0f644bf05a04e89c, cn=Bhaurao Raghunath Gavit
Date: 2019.09.16 12:01:16 +05'30'

(भा.र.गावित)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. संचालक, वि.जा.भ.ज., महाराष्ट्र राज्य, पुणे
२. सर्व विभागीय समाज कल्याण अधिकारी,

३. सर्व विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी,
४. सर्व शिक्षण अधिकारी, जिल्हा परिषद,
५. सर्व शिक्षण अधिकारी, (प्राथमिक /माध्यमिक) जिल्हा परिषद,
६. शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,
७. नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई,
८. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
९. मा. मुख्य सचिव यांचे उप सचिव,
१०.मा. राज्यमंत्री (विजाभज) यांचे खाजगी सचिव,
११.मा.मंत्री (विजाभज) यांचे खाजगी सचिव